**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवनिंग लक्ष्मण सिध्दरेड्डी
पो.सोरडी, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, जत,
पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, सोरडी,
ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवनिंग लक्ष्मण सिध्दरेड्डी
पो.सोरडी, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, जत,
पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती अ.द.इटाई

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, सोरडी,
ता.जत, जि.सांगली श्री.आर.के.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१२.२००६, २६.१.२००७ व दि.२७.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.७.२००७ व २४.१०.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जमिनीच्या नोंदी करताना लगतच्या धारकाची नोंद केली व बनावट खरेदी म्हणून आपली नोंद रद्द केली, याबाबतची माहिती मागणारे तीन अर्ज आपण केले होते. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, सोरडी, ग्रामपंचायत सोरडी, ता.जत, जि.सांगली यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीची पूर्तता केली नाही, म्हणून संबंधितांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवनिंग लक्ष्मण सिद्दरेड्डी यांनी केली.

सन १९८४-८५ मध्ये अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या प्रकरणातील जमीन श्रीमती रत्नाबाई सखाराम औताडे यांनी खरेदी केल्याचा दस्त आहे, त्याची नोंद होण्याबाबत त्यांच्या वतीने कुलमुखत्यार (अपीलकर्ता श्री.शिवनिंग लक्ष्मण सिध्दरेड्डी) यांनी सन १९८८-८९ मध्ये अर्ज केले. परंतु दस्त नोंदणीबाबतचा निर्णय ग्रामपंचायतीकडे असून बोगस खरेदीपत्र झाले

असा ठराव करून ग्रामपंचायतीने संबंधित खरेदी दस्त रद्द केले. सन १९८४ मध्ये एकाच मालमत्तेला दोन क्रमांक पडले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, सोरडी, ग्रामपंचायत सोरडी, ता.जत, जि.सांगली श्री.आर.के.शिंदे यांनी केले. श्री.सिध्दरेड्डी यांनी केलेल्या मागणीप्रमाणे उतारे देता येत नाहीत, खरेदीखत करून घेताना फसवणूक झाल्याचा हा विषय आहे. श्री.सिध्दरेड्डी यांनी अपील केल्यानंतर प्रत्यक्ष स्थळपाहणी केली व अपीलकर्त्यास वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती अ.द.इटाई यांनी केले.

खरेदीखत योग्य की अयोग्य हे ठरविणे व त्यानुसार नोंदणी करणे-न करणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि प्रत्यक्ष जागेची मोजणी करून अपीलकर्ता श्री.सिध्दरेड्डी यांना माहिती देण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली यांनी करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. सन १९६५ पासूनच्या अभिलेखाची पडताळणी करून याबाबतचा सर्व तपशील तपासला असता ज्यांच्या मालकीची जागाच नाही त्याने श्रीमती औताडे यांना खरेदी दिली आहे. त्यामुळे व्यवहारच चुकीचा झाला असून ग्रामपंचायतीने त्याची नोंद करण्याचे नाकारले. तरीही श्री.सिध्दरेड्डी विविध पातळीवर तक्रारी अर्ज, न्यायालयीन दावे, माहितीच्या अधिकारातील अर्ज व अपिले सातत्याने करीत आले आहेत. तरीही श्रीमती औताडे या गरीब, गरजू, विधवा व निराधार महिला असल्यामुळे त्यांना जागा देण्यासाठी आपण प्रयत्न केले. अन्यत्र जागा देण्याचे ग्रामपंचायतीने श्रीमती औताडे यांच्या समक्ष मान्य केले. परंतु श्री.सिध्दरेड्डी यांनी 'खरेदी दस्तावर वर्णन केलेलीच जागा पाहिजे व आतापर्यंत झालेला खर्च मिळावा', असा आग्रह धरल्यामुळे अंतिम निर्णय होऊ शकलेला नाही, असा तपशिलवार अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती अ.द.इटाई यांनी

दि.२४.७.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. केवळ माहिती देण्याच्या पलीकडे जाऊन मूळ प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.जिनपाल बळवंत पाटील
बुर्ली, ता.पलूस, जि.सांगली — अपीलकर्ता
(२)श्री.शिवलिंग ज्ञानोबा हिंगमिरे
५९, राज्ञेय गव्हर्मेंट कॉलनी, कुपवाड रोड, ता.मिरज, जि.सांगली

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली — उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, तासगाव,
ता.तासगाव, जि.सांगली
(१)**जन माहिती अधिकारी** तथा ~~अधीक्षक~~ कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली
(२)**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, तासगाव,
ता.तासगाव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४७+१०२० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.जिनपाल बळवंत पाटील
बुर्ली, ता.पलूस, जि.सांगली

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.डी.जी.मळेकर

(१)**जन माहिती अधिकारी** तथा ~~अधीक्षक~~ कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००८ (अ.क्र.१०२०)<br>दि.१.७.२००८ (अ.क्र.९४७) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१.२००९ (अ.क्र.१०२०)<br>दि.१९.७.२००८ (अ.क्र.९४७) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.२.२००९ (अ.क्र.१०२०)<br>दि.१२८.२००८ (अ.क्र.९४७) |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००९ (अ.क्र.१०२०)<br>दि.१३.१०.२००८ (अ.क्र.९४७) |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ व २९.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

रस्त्याबाबतच्या वादात तडजोड होऊन चुकीची अंमलबजावणी केली आहे. महसूल खात्याकडील अभिलेखाप्रमाणेच रस्ता होणे आवश्यक असताना झालेली मोजणी चुकीची आहे व तडजोडीनंतर मोजणीच्या खुणा बदललेल्या आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जिनपाल बळवंत पाटील (अ.क्र.९४७) यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तासगाव यांनी याबाबत योग्य खुलासा केलेला आहे. तसेच याच संदर्भात श्री.अशोक आप्पासाहेब चौगुले यांनीही अपील केले आहे. दोन्ही अपीलकर्त्यांची एकच मागणी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव यांनी केले.

संबंधित विषयात भूमी अभिलेख विभागाने केलेल्या कार्यवाहीचा नेमका तपशील अपीलकर्त्यास कळवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, तासगाव, जि.सांगली श्री.विश्वनाथ तुकाराम शिंदे यांनी दि.२२.९.२००९ च्या पत्रान्वये तपशीलवार अहवाल आयोगाला सादर केला. या संदर्भातील वाद प्रकरणी सर्व संबंधित जमिनीची फेरमोजणी दि.१३.२.२००८ रोजी करण्यात येऊन दि.२८.२.२००८ रोजी हद्दी कायम करण्यात आल्या आहेत, असे अहवालात नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सचिन भालचंद्र अपसिंगकर
बालाजी कॉलनी क्र.२, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, नगरपालिका (सा.प्र.वि.),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बार्शी नगरपरिषद, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, नगरपालिका (सा.प्र.वि.),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बार्शी नगरपरिषद, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.अशोक भड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.३.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सचिन भालचंदग अपसिंगकर यांनी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ (नियमाधीन) श्रेणीवाढ नियमांतर्गत सन २००१ ते २००७ या काळात दाखल झालेल्या प्रकरणांबाबतची माहिती मागितली होती. माहिती विस्तृत असल्यामुळे ती संकलित करून देण्यासाठी मनुष्यबळ व साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्यामुळे शक्य होणार नाही, विशिष्ट प्रकरणाची माहिती नेमकेपणाने मागितल्यास देता येईल, असे कळविले होते. तसेच अभिलेखाचे अवलोकन करण्याबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही निर्णय दिला. हा माहिती नाकारण्याचाच प्रकार आहे, म्हणून माहिती लेखी मिळावी व संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.सचिन भालचंद्र अपसिंगकर यांनी आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.अपसिंगकर यांनी विशिष्ट तक्त्यामध्ये व विस्तृत माहिती मागितली आहे. त्यांना माहिती संकलित करून देणे शक्य नसल्यामुळे अवलोकनासाठी कळविले, माहिती नाकारलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.अशोक भड यांनी नमूद केले.

६७०० भूखंड असून त्याबाबतची ६ वर्षांमधील माहिती श्री.अपसिंगकर यांना हवी असल्यामुळे त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करून घेणे आवश्यक आहे, असे कळवूनही ते आले नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अभिलेखाचे अवलोकन करून श्री.अपसिंगकर आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती नियमानुसार योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हरिष रामचंद्र दास
घर क्र.३०, नवीन खडकी पोलीस लाईन, पुणे ४११ ००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप-आयुक्त,
परिमंडळ-३, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हरिष रामचंद्र दास
घर क्र.३०, नवीन खडकी पोलीस लाईन, पुणे ४११ ००३

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर श्री.एस.आर.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.०४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०२.०६.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी सर्व पक्षकार गैरहजर राहिल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पोलीस हवालदार श्री.प्रदीप विनायक मोडक यांना दिलेल्या राष्ट्रपती पदकाच्या संदर्भातील माहिती गोपनीय असल्याच्या कारणावरून व विलंबाने नाकारली गेली. ती माहिती मिळावी, तसेच माहितीच्या अधिकारात माहिती मागितल्यानंतर पाच दिवसांत आपली सूडबुध्दीने बदली करण्यात आली, याची दखल घ्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.हरिष रामचंद्र दास यांनी केली.

श्री.दास यांनी माहिती मागितली त्या काळात पुणे शहर पोलीस भरती प्रक्रिया चालू होती. तसेच माहितीशी संबंधित मुद्दयानुसार त्या त्या विभागाकडे त्यांचा अर्ज हसतांतरित करण्यात आला. गोपनीय शाखेकडून उत्तर प्राप्त होताच ते श्री.दास यांना देण्यात आले. या प्रक्रियेत माहिती देण्यास विलंब झाला. राष्ट्रपती पदकाशी संबंधित अंतर्गत शिफारशींची माहिती गोपनीय असल्याचे गोपनीय शाखेने कळविल्यामुळे ती नाकारण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर श्री.एस.आर.चौगुले यांनी केले.

संबंधित माहिती सार्वजनिक स्वरूपाच्या विषयाशी संबंधित असून गोपनीय मानता येणार नाही. राष्ट्रपतीपदक प्रदान करण्याची प्रक्रियाही पूर्ण झालेली आहे. त्यामुळे त्याबाबतची अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती देणे आवश्यक आहे. त्यानुसार एक आठवड्यात कार्यवाही करून आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

त्यानुसार संबंधित माहिती श्री.दास यांना देण्यात आल्याचा अहवाल माहितीच्या प्रतींसह जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर श्री.एस.आर.चौगुले यांनी दि.२१.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी मारूती बागल
मु.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी मारूती बागल
मु.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि. पुणे श्री.प्रशांत सुमंतराव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि. पुणे श्री.सुहास महादेव चिंचोडीकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जागेच्या संदर्भात अतिक्रमण हटवून पूर्ववत आपले नाव लागावे या मागणीबाबत कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. १९९२ साली लोकआयुक्तांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कारवाईसंबंधीची मूळ कागदपत्रे गहाळ आहेत. तहसीलदार, आंबेगाव यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडून नकाशे तयार करून नोंदीमध्ये योग्य ती दुरूस्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी मारूती बागल यांनी केली.

राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित केलेल्या क्षेत्रातील काही जागेवर अतिक्रमण झाले असून राष्ट्रीय महामार्ग विभागाला न लागणारे हे क्षेत्र अतिक्रमण काढून आपल्याला परत मिळावे, अशी श्री.बागल यांची मुख्य मागणी आहे. याबाबत विविध पातळ्यांवर वेळोवेळी ते अर्ज करीत आले आहेत व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी त्यांना देण्यात आली आहे. परंतु त्यांच्या वडिलांनी पूर्वीच विकलेल्या जमिनीवर वारस म्हणून नोंद करावी, अशी त्यांची मागणी असून, अशी नोंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव श्री.प्रशांत सुमंतराव पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अतिक्रमण काढणे, वारस नोंद करणे या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. मात्र त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती व मूळ क्षेत्राच्या मोजणीबाबतची भूमी अभिलेख खात्याकडून माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसात द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) यांच्या कार्यालयामार्फत भूकरमापक, मंचर यांनी श्री.बागल यांना उपअभियंता, राज्य महामार्ग उपविभाग क्र.६२, नारायणगाव यांच्या प्रतिनिधीच्या समक्ष हद्दीचे सीमांकन दाखवले व आपली तक्रार मिटल्याने अर्ज मागे घेत असल्याचे श्री.बागल यांनी लेखी दिले असल्याचे संबंधित पत्र व नकाशाच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव श्री.प्रशांत सुमंतराव पाटील यांनी दि.१४.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.१२.२००९